नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २०६ | Issue - 206 | वार मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५ | Blow- Tuesday Date 16 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचे बिगूल वाजले

## १५ जानेवारी २०२६ ला मतदान, १६ जानेवारीला निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. राज्य निवडणूक आयोगाची आज अतिशय महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या महत्त्वाच्या टप्प्याच्या निवडणुकांची चर्चा आहे. याआधी राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली तेव्हाच स्पष्ट केलं होतं की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या दोन टप्प्यात होतील. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आधी राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींची निवडणूक घेतली. या निवडणुकीचे निकाल येत्या २१ डिसेंबरला लागणार आहेत. त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यातील निवडणुका होणार आहेत.

सुप्रीम कोर्टाने याआधीच राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ च्या आधी निवडणुका घेण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून आता दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीची घोषणा झाली आहे. राज्यातील मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर शहरांसह एकूण २९ महत्त्वाच्या शहरांमधील महापालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. पण आता या निवडणुका होणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाचे अध्यक्ष दिनेश वाघमारे यांनी आज पत्रकार परिषद घेत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला.



आजच्या पत्रकार परिषदेत मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ३१ जानेवारी २०२६ च्या अखेर पर्यंत घेण्याचं नियोजन आणि त्या दृष्टीकोनाने केलेलं नियोजन याबाबत माहिती देण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केली आहे. मला आपल्याला सांगावसं वाटतं की, ही पत्रकार परिषद राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी आहे. महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुकीबाबत ही पत्रकार परिषद आहे. त्यापैकी २७ महापालिकांची मुदत संपलेली आहे. २०२० मध्येच मुदत संपली होती. मुंबईसह १८ महापालिकांची २०२२ मध्ये मुदत संपली होती. ४ महापालिकांची मुदत २०२३ मध्ये संपली होती. जालना आणि इचलकरंजी या नवनिर्वाचित महापालिका आहेत. त्यांची सुद्धा मी माहिती सांगणार आहे, असं आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले.

मुंबई महापालिका वगळता इतर ठिकाणी ३ ते ५ उमेदवारांना मतदान करावं लागणार

मुंबई महापालिकेत प्रभागात एक सदस्यीय प्रभाग आहे. मुंबई महापालिकेसाठी प्रत्येक मतदाराला केवळ १ मत द्यावं लागेल. तर २८ महापालिका या बहु सदस्यीय आहेत. बहुतांश महापालिकेत एका प्रभागात ४ उमेदवार निवडून द्यायचे आहेत. त्या महापालिकेत काही प्रभाग असेल आहेत की, जिथे ३ उमेदवार असतील तर काही प्रभागात ५ उमेदवार असतील. त्यामुळे या २८ महापालिकांमध्ये मतदारांना साधारणपणे ३ ते ५ मते द्यावे लागतील, अशी महत्त्वाची माहिती देखील त्यांनी दिली.

निवडणुकांचा कार्यक्रम कसा असेल?

२९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी नामनिर्देश पत्र स्वीकारण्याचा कालावधी हा २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ असणार आहे. या नामनिर्देशन पत्राची छाननी ३१ डिसेंबर २०२५ ला होणार आहे. उमेदवारी माघारीची मुदत ही २ जानेवारी २०२६ अशी असणार आहे. तर निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी २०२६ ला होईल. या महापालिकांसाठी मतदान १५ जानेवारी होईल. तर १६ जानेवारी २०२६ ला मतमोजणी होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

कोणकोणत्या महापालिकांमध्ये निवडणूक होणार?

मुंबई चचठऊ विभाग :

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, भिवंडी, मीरा-भाईंदर, उल्हासनगर, पनवेल

पश्चिम महाराष्ट्र विभाग:

पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, इचलकरंजी

उत्तर महाराष्ट्र विभाग :

नाशिक, अहिल्यानगर, धुळे, जळगाव, मालेगाव

मराठवाडा विभाग :

छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड-वाघाडा, परभणी, जालना

विदर्भ विभाग : नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर

# विम्याच्या पैशांसाठी मृत्यूचा बनाव, लिफ्ट मागणाऱ्याला कारमध्ये संपवले

लातूर : दोन दिवसांपूर्वी लातूर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली होती. औसा वाढवणा या रोडवर एक कार जळत असलेल्या अवस्थेत सापडली. यामध्ये एकाचा मृत्यू झाल्याचंही समोर आलं. व्यक्तीला लिफ्ट देऊन त्याची हत्या करून कार जाळली असल्याचं समोर आलं आहे.

अटकेतील आरोपी गणेश गोपीनाथ चव्हाण (रा. विठ्ठल नगर, औसा) हा मयत बळीराम राठोड पाटील गल्ली, औसा) यांना लिफ्ट दिली. दारूच्या नशेत असलेल्या गोविंदला ड्रायव्हर सीटवर बसवून सीट बेल्ट लावले. सीटवर मचीसच्या काड्या व प्लास्टिक पिशव्या टाकून आग लावली व पेट्रोल टाकीचं झाकण उघडं ठेवून तो पसार झाला. कार पूर्ण जळाल्यानंतर गणेश सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग येथे पसार झाला होता. मात्र, पोलिसांच्या संयुक्त पथकाने त्याचा पाठलाग करून अटक केली.



गणेश चव्हाण या घटनेनंतर एका महिलेच्या संपर्कात होता. महिलेला ताब्यात घेतल्यानंतर गणेश वेगळ्याच नंबरवरून महिलेसोबत मेसेजवरत बोलत होता. यामुळे पोलिसांना त्याच्या लोकेशनचा सुगावा लागला आणि त्या दिशेने पोलीस रवाना झाले. त्याला सिंधुदुर्ग येथून ताब्यात घेतलं. सदरील महिलेची चौकशी अद्याप सुरू आहे. यामध्ये त्या महिलेला आधीच काही माहिती होते का? या दृष्टीने पोलिसांची चौकशी सुरू आहे. सदरील महिला त्याची मैत्रीण आहे की प्रेयसी याचाही शोध पोलीस घेत आहेत.

मात्र, यात स्वतःच्याच मृत्यूचा बनावट प्लॅन तयार केला आणि विमा कंपनीकडून एक कोटी रुपये लाटण्याचा प्रयत्न केला. मात्र, एका फोननं सर्व प्रकरण उघड झालं.

लातूरमधील औसा तालुक्यातील वानवडा रोडवर १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता एका कारला आग लागून ती पूर्णपणे जळाली होती. कारमध्ये एक व्यक्ती जळून मृत्यूमुखी पडला होता. या प्रकरणाचा तपास करताना औसा पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने महत्त्वपूर्ण कामगिरी करीत गुन्हा उघडकीस आणला आहे. कर्जबाजारीपणामुळे विम्याची रक्कम मिळवण्यासाठी आरोपीने अनोळखी

यांचा मेहुणा असून तो त्यांची कार क्र. चक४३ इ ४२०० वापरत होता. आर्थिक अडचणीत सापडलेला गणेश गेल्या तीन वर्षांपासून एक कोटी रुपयांचा टर्म इन्शुरन्सधारक होता. त्याच्यावर सुमारे ५७ लाख रुपयांचं कर्ज होतं. कर्ज फेडण्यासाठी व कुटुंबाला विम्याची रक्कम मिळावी यासाठी त्याने स्वतःची आत्महत्या किंवा दुसऱ्या व्यक्तीची हत्या करून तो स्वतःचा असल्याचा बनाव करण्याचा विचार गेल्या एक महिन्यापासून करत होता.

१३ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता घरातून बाहेर पडलेल्या गणेशने याकतपूर नपूर रोड चौकात गोविंद किशन यादव (वय ५०, रा.

यावप्रकरणी औसा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५२१/२०२५ कलम १०३ (१), २३८ भा.दं.वी. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, सहाय्यक निरीक्षक सदानंद भुजबळ व औसा ठाण्याचे निरीक्षक रेवणनाथ डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने हा गुन्हा उघडकीस आणला.

# थेट मुंबई उच्च न्यायालयाच्या दारात एकानं स्वत:ला पेट्रोलनं पेटवून घेतलं, तब्बल ६० टक्के भाजल्याची भीती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाच्या गेट क्रमांक ४ बाहेर आज (१५ डिसेंबर) खळबळजनक घटना घडली. प्रकाश सावंत नावाच्या व्यक्तीने स्वतःवर पेट्रोल ओतून स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. ही घटना न्यायालय परिसरात घडल्याने अनेकांची भंबेरी उडाली. घटनेनंतर उपस्थितांनी आणि सुरक्षारक्षकांनी तत्काळ धाव घेत कोटने तसेच पाणी मारून आग विझवण्याचा प्रयत्न केला. गंभीर जखमी झालेल्या प्रकाश सावंत यांना तातडीने उपचारासाठी मुंबईतील जी. टी. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार सावंत हे सुमारे ५० ते ६० टक्के भाजल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, कोकणातील एका जागेच्या वादातून हा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. संबंधित प्रकरणात प्रकाश सावंत यांनी एका वकिलाला एकूण ६ लाख ८० हजार रुपये दिले होते. यापैकी ६ लाख रुपये वकिलाने परत केले असून उर्वरित ८० हजार रुपये देण्यास वकिलाकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप सावंत यांनी केला होता. या आर्थिक वादातूनच सावंत यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच आझाद मैदान पोलिस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, न्यायालय परिसरात घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली पुढील तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग; भाजपच्या गोटात लक्षवेधी हालचाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: संसदेच्या हिवाळी अधिवेशनामुळे राजधानी दिल्लीतील वातावरण तापलं आहे. एककीडे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी १९ डिसेंबरला मोठा राजकीय भूकंप होईल, असं भाकीत केलेलं आहे. तर दुसरीकडे भाजपच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. देशाचा पंतप्रधान बदलेल आणि मराठी माणूस पंतप्रधान होईल, असा असंही चव्हाण म्हणाले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. यानंतर आता भाजपच्या गोटात घडामोडींना वेग आला आहे.

संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरु असताना भाजपनं आपल्या सगळ्या खासदारांसाठी व्हिप जारी केलेला आहे. १५ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत सदनात उपस्थित राहण्याच्या सूचना भाजपकडून त्यांच्या खासदारांना देण्यात आल्या आहेत. या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयकं संसदेत मांडली जातील. हिवाळी अधिवेशन संपण्यास थोडासा अवधी शिल्लक आहे. काही दिवसांनंतर अधिवेशनाचं सूप वाजेल. हिवाळी अधिवेशनाचे सुरुवातीचे काही दिवस गोंधळाचं वातावरण पाहायला मिळालं. त्यामुळे संसदेचं कामकाज फार वेळ चाललं नाही. गेल्या काही दिवसांपासून संसदेत कामकाज होत आहे. पण सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार वाकयुद्ध सुरु आहे. वंदे मातरम्, निवडणूक सुधारणा यावरुन संसदेत वादळी चर्चा झाली. या दरम्यान भाजपनं आपल्या सगळ्या खासदारांसाठी व्हिप जारी केलेला आहे. आज संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा अकरावा दिवस आहे. संसदेचं कामकाज सुरु होताच गोंधळ झाला.

**कल्याणमधील कुटुंबावर काळाचा घाला**


**लहान मुले गंभीररित्या जखमी, चिंचपाडा परिसरात शोककळा**

# समृद्धी महामार्गावर कारचा टायर फुटल्याने अपघातात चौघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण : राज्यातील सर्वात वेगवान महामार्ग अशी ओळख असलेल्या समृद्धी महामार्गामुळे अगदी कमी वेळात प्रवास करणे शक्य झाले असले तरी हा महामार्ग मृत्यूचा सापळा ठरत असल्याच्या गृहीतकावर शिक्कामोर्तब करणाऱ्या घटना वारंवार घडताना दिसत आहेत. समृद्धी महामार्गावर सातत्याने अपघात होत असतात. यामध्ये आता आणखीन एका अपघाताची भर पडली आहे. यामुळे कल्याण परिसरातील एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. समृद्धी महामार्गावर सिन्नर तालुक्यातील पाटोळे येथे सोमवारी हा अपघात झाला. कारचा टायर फुटल्यामुळे हा अपघात झाला. या अपघातामध्ये निलेश बुकाणे, वैशाली घुसळे या दोघा बहीणभावांसह निलेश बुकाणे यांच्या पत्नीचा मृत्यू झाला आहे. तर त्यांच्यासोबत असलेली लहान मुलं गंभीररित्या जखमी झाली आहेत. हे सर्वजण कल्याण पूर्वेला असणाऱ्या चिंचपाडा परिसरात वास्तव्याला होते. या अपघाताच्या बातमीने चिंचपाडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

हे सर्वजण एका लग्नसमारंभासाठी जात असताना हा अपघात घडला. सिन्नर तालुक्यातील पाटोळे शिवारानजीक वेगात धावणाऱ्या किया कारचा अचानक टायर फुटला. टायर फुटताच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या कडेला पलटी झाली. यावेळी ही कार इतक्या वेगात होती की या कारचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. त्यामुळे गाडीतील तिघांचा मृत्यू झाला. या अपघाताच्या जोरदार आवाजाने पाटोळे परिसरातील स्थानिक रहिवाशांनी समृद्धी महामार्गावर (डर्रींविवहळ क्ळसहुरू) धाव घेतली. जखमींना उपचारासाठी सिन्नर येथे घेऊन जात असतानाच नीलेश बुकाणे यांचा मृत्यू झाला, तर त्यांची बहीण वैशाली सचिन घुसळे (वय ३५) हिची उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली. तसेच छाया नीलेश बुकणे (वय ३०) यांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर सचिन घुसळे (वय ४०), अर्णव नीलेश बुकाणे (वय १४), गोल्डी नीलेश बुकाणे (वय १०), सुयश घुसळे (वय ३), निरव गायकवाड



(वय १०), मनस्वी गायकवाड (वय ५), साची सचिन घुसळे (वय ९) हे गंभीर जखमी झाले आहेत. चालक प्रशांत शिरसाट (वय ३२) किरकोळ जखमी झाले आहेत.

समृद्धी महामार्ग पोलीस आणि स्थानिक पोलिसांना या संदर्भात माहिती दिल्यानंतर तातडीने बचावकार्य राबविण्यात आले. सुदैवाने मुलं बचावली असली तरी त्यांची प्रकृती गंभीर आहे. या कारमधून एकूण ११ जण प्रवास करत होते. त्यामध्ये आठ लहान मुलांचा समावेश होता. दुर्दैवाने या अपघातात प्रौढांमधील एक पुरुष आणि एक महिला जागीच ठार झाले. जखमी झालेल्या मुलांसह इतर प्रवाशांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही जखमींवर सिन्नरमधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून, गंभीर अवस्थेतील तिघांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे.

हा अपघात होण्यापूर्वी घुसळे आणि बकाणे कुटुंबीय आनंदात गाडीतून प्रवास करत होते. गाडीत सुरु असलेल्या मौजमजेचा एक व्हिडीओ त्यांच्यापैकी कोणीतरी सोशल मीडियावर शेअर केला होता. यामध्ये सर्वजण अत्यंत आनंदात दिसत होते. लहान मुलं खिदळत होती मात्र, त्यानंतर काहीवेळातच त्यांच्या गाडीचा अपघात झाला. हसत्याखेळत्या कुटुंबावर काळाने घाला घातल्यानंतर हा व्हिडीओ पाहून नातेवाईकांचे डोळे पाणावले. दरम्यान, अपघातानंतर महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, क्यूआरव्ही पथक व महामार्गावरील आपत्कालीन यंत्रणांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना १०८ रुग्णवाहिका तसेच समृद्धी महामार्गाच्या रुग्णवाहिकेद्वारे सिन्नर येथील रुग्णालयात दाखल केले. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या साहाय्याने महामार्गावरून हटवून सिन्नर पोलीस ठाण्याच्या आवारात लावण्यात आले आहे. या अपघाताची माहिती सिन्नर पोलीस ठाण्यास देण्यात आल्यानंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## संपादकीय....

### राजकीय हालचालींना वेग

संसदेच्या हिवाळी अधिवेशनामुळे राजधानी दिल्लीतील वातावरण तापलं आहे. एककीडे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी १९ डिसेंबरला मोठा राजकीय भूकंप होईल, असं भाकीत केलेलं आहे. तर दुसरीकडे भाजपच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. देशाचा पंतप्रधान बदलेल आणि मराठी माणूस पंतप्रधान होईल, असा असंही चव्हाण म्हणाले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. यानंतर आता भाजपच्या गोटात घडामोडींना वेग आला आहे. संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरु असताना भाजपनं आपल्या सगळ्या खासदारांसाठी व्हिप जारी केलेला आहे. १५ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत सदनात उपस्थित राहण्याच्या सूचना भाजपकडून त्यांच्या खासदारांना देण्यात आल्या आहेत. या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयकं संसदेत मांडली जातील. हिवाळी अधिवेशन संपण्यास थोडासा अवधी शिल्लक आहे. काही दिवसांनंतर अधिवेशनाचं सूप वाजेल. हिवाळी अधिवेशनाचे सुरुवातीचे काही दिवस गोंधळाचं वातावरण पाहायला मिळालं. त्यामुळे संसदेचं कामकाज फार वेळ चाललं नाही. गेल्या काही दिवसांपासून संसदेत कामकाज होत आहे. पण सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार वाकयुद्ध सुरु आहे. वंदे मातरम्, निवडणूक सुधारणा यावरुन संसदेत वादळी चर्चा झाली. या दरम्यान भाजपनं आपल्या सगळ्या खासदारांसाठी व्हिप जारी केलेला आहे. आज संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा अकरावा दिवस आहे. संसदेचं कामकाज सुरु होताच गोंधळ झाला. काल काँग्रेसच्या दिल्लीतील रॅलीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींसंदर्भात अपशब्द वापरण्यात आले. तो मुद्दा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी उपस्थित केला. रिजिजू यांनी काँग्रेसकडून माफीची मागणी केली. यावरुन राज्यसभेत गोंधळ झाला. त्यामुळे सदनाचं कामकाज थांबवावं लागलं. संसदेत अणु ऊर्जा विधेयक मांडलं जाण्याची शक्यता आहे. कॉर्पोरेट विधेयक आणि उच्च शिक्षणाशी संबंधित विधेयकावर चर्चा अपेक्षित आहे. यातील अणु ऊर्जा विधेयक अतिशय महत्त्वाचं आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास अणु ऊर्जा क्षेत्रात खासगी क्षेत्राच्या गुंतवणुकीचा मार्ग खुला होईल. देशाच्या ऊर्जा सुरक्षेत हे विधेयक महत्त्वाचं असेल.

# मुंबईत मुलींचे अपहरण आणि राजकीय मौन : सोयीस्कर गप्पीची भयावह किंमत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई देशाची आर्थिक राजधानी, स्वप्ननगरी, प्रगतीचे प्रतीक. मात्र याच शहरात दररोज मुलींच्या अपहरणाच्या, बेपत्ता होण्याच्या आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असताना एक गंभीर प्रश्न सातत्याने उपस्थित होतो. या प्रश्नावर सर्व राजकीय पक्ष गप्प का आहेत? हे मौन केवळ दुर्लक्षाचे नाही, तर राजकीय इच्छाशक्तीच्या अपयशाचे ठळक लक्षण आहे. महिलांची सुरक्षितता राजकीय अजेंड्यावर का नाही? कारण महिलांची सुरक्षितता हा उद्घाटन करता येणारा प्रकल्प नाही. रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो दिसतात; पण सुरक्षिततेचे परिणाम आकड्यांत आणि फलकांवर मांडता येत नाहीत. त्यामुळे हा मुद्दा निवडणुकीपुरता घोषणांमध्ये येतो, प्रत्यक्ष कृतीत नाही.

'घटना' म्हणून पाहण्याची मानसिकता, अपहरणाच्या घटना पोलिसी नोंदी बनतात, बातम्यांचे मथळे होतात आणि काही दिवसांत विसरल्या जातात.

त्याकडे सामाजिक आपत्ती, प्रशासनिक अपयश आणि व्यवस्थात्मक दोष म्हणून पाहिले जात नाही. हीच मानसिकता गुन्हेगारीला खतपाणी घालते. सत्ता आणि विरोधक जबाबदारीपासून पळ काढण्याचा प्रयत्न असते. सत्ताधाऱ्यांना कायदा-सुव्यवस्थेतील अपयश मान्य करायचे नसते; विरोधकांना 'सेलिंग पॉईंट' न मिळाल्याने आक्रमक भूमिका घ्यायची नसते. परिणामी, लोकशाहीतील जाब विचारण्याची प्रक्रिया ठप्प होते. कायदे आहेत, पण भीती नाही. पोक्सो, महिला संरक्षण कायदे, खझउ कायद्यांची कमतरता नाही. मात्र तपासातील विलंब, आरोपपत्र दाखल होण्यास लागणारा वेळ, साक्षीदार संरक्षणाचा अभाव आणि फास्ट ट्रॅक न्यायालयांची अपुरी संख्या, यामुळे गुन्हेगार निर्भय होतो. कायदा अस्तित्वात असणे आणि प्रभावी असणे यात मोठा फरक आहे. पोलिस यंत्रणेवरील वास्तववादी दडपण, मुंबई पोलिसांवर प्रचंड जबाबदारी आहे,

**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

लोकसंख्या, स्थलांतर, झोपडपट्ट्या, संघटित गुन्हेगारी, व्हीआयपी बंदोबस्त. मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान आणि राजकीय स्वायत्ततेअभावी पोलिस एकटे पडतात. संपूर्ण दोष पोलिसांवर ढकलणे हा सोपा, पण धोकादायक मार्ग आहे. महिला सक्षमीकरण : भाषण विरुद्ध वास्तव, महिला दिनी सन्मान, जाहिराती, योजना सगळे काही असते. पण जर मुलगी बसमध्ये, रेल्वेत, गल्लीमध्ये सुरक्षित नसेल, तर सक्षमीकरण ही केवळ शब्दांची माळ ठरते. सुरक्षितता ही सक्षमीकरणाची पहिली अट आहे. माध्यमांची मर्यादा आणि जबाबदारी असते पण माध्यमे बातमी देतात, पण सातत्याने पाठपुरावा होत नाही. 'ब्रेकिंग न्यूज' संपली की विषय संपतो. त्यामुळे राजकीय दबाव तयार होत नाही. माध्यमांची भूमिका केवळ बातमी देण्यापुरती नसून प्रश्न जिवंत ठेवण्याची आहे.

समाजाची सामूहिक जबाबदारी, हा प्रश्न केवळ सरकारचा नाही. त्याकरिता पालकांनी जागरूक राहणे, शाळांमधून संवेदनशील शिक्षण, समाजाने हस्तक्षेप करणे, नागरिकांनी तक्रार करण्याचे धैर्य दाखवणे, हे सगळे आवश्यक आहे. मौन ही केवळ राजकीय नाही, तर सामाजिकही समस्या आहे. शेवटी मौन म्हणजे अप्रत्यक्ष सहभाग होय.

आज जे राजकीय पक्ष गप्प आहेत, ते उद्या आम्हाला माहिती नव्हती असे म्हणू शकत नाहीत. कारण मौन म्हणजे अप्रत्यक्ष सहभाग आणि या सहभागाची किंमत निष्पाप मुलींना मोजावी लागत आहे. पुढचा मार्ग केवळ घोषणा नव्हे तर, महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र कृती आराखडा, सीसीटीव्ही आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जलद तपास व त्वरित शिक्षा, फास्ट ट्रॅक कोर्ट वाढवणे, पोलिसांना स्वायत्तता व संसाधने, हे उपाय तात्काळ राबवले पाहिजेत.

ज्या शहरात मुली सुरक्षित नाहीत, तिथे विकास, प्रगती आणि 'विश्वगुरू'ची स्वप्ने पोकळ ठरतात. आज जर राजकीय इच्छाशक्ती जागी झाली नाही, तर उद्या हा प्रश्न प्रत्येक घराच्या दारात उभा राहील आणि तेव्हा दोष देण्यासाठी कोणीही उरणार नाही.

# मुंबईत येणार जगातील सर्वात मोठा जीसीसी प्रोजेक्ट; ४५ हजार रोजगार निर्माण होणार

मुंबई : महाराष्ट्राला ऋछउ (जीसीसी) हब बनवण्याच्या दिशेने हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असून ब्रुकफील्ड कंपनी मुंबईत सुमारे २० लाख चौरस फूट क्षेत्रावर आशियातील सर्वात मोठे Global Capability Center (GCC) अर्थात जागतिक क्षमता केंद्र उभारणार आहे. या प्रकल्पातून १५,००० थेट आणि ३०,००० अप्रत्यक्ष असे एकूण ४५,००० रोजगार निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जिओ कन्व्हेशन सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला, सीईओ, NSR, विक्रम आहुजा, ब्रुकफिल्डचे अंकुर गुप्ता यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या गुंतवणूक व तांत्रिक भागीदारी प्रकल्पाच्या अनुषंगाने यावेळी चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि उद्योगसुलभ वातावरणामुळे महाराष्ट्र जागतिक कॅपेबिलिटी सेंटरचे पसंतीचे ठिकाण ठरत आहे. नव्या ऋछउ धोरणामुळे मोठ्या प्रमाणात कौशल्याधारित रोजगारनिर्मिती आणि आर्थिक वृद्धी साधली जाईल. जागतिक लॉजिस्टिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी FedEx देखील मुंबई-नवी मुंबई विमानतळ परिसरात आपल्या GCC आणि इतर ऑपरेशन्ससाठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, मायक्रोसॉफ्टने आपल्या गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राचा विचार करावा, याबाबत त्यांना विनंती केली असून सध्या देखील त्यांची सर्वात मोठी गुंतवणूक महाराष्ट्रामध्येच आहे. आगामी काळात मायक्रोसॉफ्ट मोठी गुंतवणूक करेल आणि महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेचे केंद्र बनवण्यासाठी पुढाकार घेईल.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे

मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी आयोजित Microsoft I Tour कार्यक्रमात सहभाग घेतला. सत्या नडेला यांनी महाराष्ट्र सरकारसोबत विकसित केलेल्या Crime IOS प्लॅटफॉर्मचे विशेष प्रदर्शन या कार्यक्रमात केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सत्या नडेला यांच्या सोबत झालेल्या या बैठकीत आरोग्य, शिक्षण, कृषी आणि सरकारी सेवा वितरणासाठी I Co-Pilots विकसित करण्यावर चर्चा झाली. मायक्रोसॉफ्टने भारतातील त्यांच्या १७ अब्जांच्या सर्वात मोठ्या गुंतवणुकीत महाराष्ट्राला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले. महाराष्ट्राने विकसित केलेल्या मार्बल चरीलश्रश प्लॅटफॉर्ममुळे सायबर आणि आर्थिक गुन्हे ३-४ महिन्यांच्या ऐवजी फक्त २४ तासांत शोधता येतात. ज्यामुळे लोकांचे पैसे वाचत आहेत आणि गुन्हेगारांना शोधणे अधिक जलद झाले आहे. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, उद्योग विभागाचे सचिव डॉ. अनबलगन, यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.

# महावितरणने एका झटक्यात फेडले १२,८०० कोटींचे कर्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी असलेल्या महावितरणने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतीपूर्वी एकाच हफ्त्यात नुकतीच परतफेड केली. अन्य वित्तीय संस्थेकडून कमी व्याज दराचे कर्ज उभारून तसेच स्वनिधीतून ही परतफेड केली असून त्यामुळे व्याजाच्या रकमेत मोठी बचत होईल, अशी माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची सूचना केली असून त्यादृष्टीने कंपनीवरील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी यशस्वी पावले टाकण्यात आली.

महावितरणने विविध टप्प्यांवर स्टेट बँकेकडून एकूण १२,८०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यासाठी ८.६५ टक्के ते ९.२५ टक्के दराने व्याज द्यावे लागत होते. त्याऐवजी अन्य वित्तीय संस्थेकडून ७,१०० कोटी रुपये कर्ज ८.२५ टक्के इतक्या कमी व्याजदराने उभारून महावितरणने स्टेट बँकेचे ७,१०० कोटी रुपयांचे कर्ज फेडले. त्या खेरीज महावितरणने स्वनिधीतून ५,६३४ कोटी रुपयांचे स्टेट बँकेचे कर्ज फेडले.

महावितरणने स्टेट बँकेचे कर्ज घेताना आपल्या दहा सर्कलमधील महसूल तारण म्हणून ठेवला होता. या सर्कलमध्ये वार्षिक तीस हजार कोटी रुपयांचा महसूल आहे. स्टेट बँकेचे सर्व कर्ज फेडल्यामुळे हा महसूल तारणमुक्त होईल. त्या आधारे कंपनीला ५०,००० कोटी रुपयांपर्यंतचा निधी माफक व्याजदरात कर्जरुपाने उभा करता येईल.

महावितरणची पत वाढविणारे पाऊल – महावितरणने एकाच हफ्त्यात स्टेट बँकेच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतपूर्व परतफेड करण्यामुळे कंपनीची वित्तीय बाजारातील पत वाढली आहे. ही घडामोड गुंतवणूकदारांचा विश्वास वाढविणारी आहे. कंपनीसाठी भविष्यात खासगी किंवा सार्वजनिक बाँड उभारायचे झाल्यास त्यासाठीही इतक्या मोठ्या कर्जाची परतफेड करणे उपयुक्त ठरणारे आहे. आगामी काळात महावितरणला शेअर बाजारात सूचिबद्ध करण्याच्या दृष्टीनेही ही कर्जाची परतफेड महत्त्वाची आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जागतिक फुटबॉलपट्टू लिओनेल मेस्सी यांच्या हस्ते प्रोजेक्ट महादेवा'चा शुभारंभ

# २०३४च्या फुटबॉल विश्वचषकासाठी 'प्रोजेक्ट महादेवा' मधून गुणवान खेळाडू मिळतील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मिशन ऑलिम्पिक २०२६ अंतर्गत महाराष्ट्रातून अधिकाधिक सुवर्णपदके मिळवणे आणि २०३४ पर्यंत फुटबॉल विश्वचषकासाठी तयारीचे लक्ष्य ठेवून 'प्रोजेक्ट महादेवा' राबवण्यात येत आहे.या प्रोजेक्टमधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतील,अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनातर्फे 'प्रोजेक्ट महादेवा' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचा शुभारंभ आज वानखेडे स्टेडियम येथे करण्यात आला. 'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चखढठ), व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (तडढऋ), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखऋ), सिडको (उखऊज) आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जागतिक फुटबॉलपट्टू लिओनेल मेस्सी, अर्जेंटीनचे माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डिपॉल, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, खासदार प्रफुल्ल पटेल, भारतरत्न सचिन तेंडुलकर, भारतीय लोकप्रिय फुटबॉलपटू सुनील छेत्री, भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार राहुल भेके, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्राचे)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, श्रीमती अमृता देवेंद्र फडणवीस, गोट टूर प्रमोटर सत्तादूर दत्ता, टायगर श्रॉफ, अजय देवगण, कार्तिक आर्यन, दिनों मोरिया, जिंदाल ग्रुपच्या पार्थ जिंदल, वेदना जिंदल यांनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'प्रोजेक्ट महादेवा ' हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाचा उपक्रम आहे, जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल मधील प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेवून फुटबॉल मधील उच्च दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले, ३० मुली) पाच वर्षांची संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच अव्वल खेळाडू नक्कीच फिफा विश्वचषक मध्ये खेळतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही: सचिन तेंडुलकर

भारतरत्न सचिन तेंडुलकर म्हणाले की, जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि त्यांचे सहकारी भारतात आल्याबद्दल आणि तेही मुंबईत आल्याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार मानतो.मुंबईकरांनी ज्या प्रकारे या तिघांचे स्वागत केले ते अत्यंत अविस्मरणीय आहे. मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे आजचा क्षण हा अत्यंत अविस्मरणीय आहे. प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही. आज मला वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सन २०११ च्या क्रिकेटच्या विश्वचषकाची आठवण झाली. आजचा क्षण हा सुवर्ण अक्षराने लिहिला जाईल. खेळामध्ये खेळाडूंना चिकाटी जिद्द अत्यंत महत्त्वाचे आहे लिओनेल मेस्सी जागतिक दर्जाचा खेळाडू असून त्याच्यामध्ये संवेदनशीलता त्याच प्रकारे त्यांनी या खेळाडूला दिलेल्या उत्तेजन अत्यंत महत्त्वाचे आहे याबद्दल मी मेसेज आभार मानतो आणि मेसीला व त्याच्या कुटुंबांना आरोग्यमय शुभेच्छा देतो.

### महाराष्ट्रातून निवडलेल्या १३ वर्षाखालील ६० फुटबॉलपटूंना विशेष प्रशिक्षण शिबिर व मार्गदर्शन

लिओनोल मेस्सी या नावाचा वानखेडे स्टेडियमवर जल्लोष

जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फुटबॉल प्रेमींना फुटबॉल प्रेक्षकांकडे भिरकवताच प्रेक्षकांनी लिओनोल मेस्सी या नावाचा जल्लोष केला. संपूर्ण मैदान मेस्सीच्या नावाने दुमदुमत होते. या वेळेला जागतिक फुटबॉलपटू लिओनल मेस्सीला सचिन तेंडुलकर यांच्या नावाची दहा नंबरची जर्सी सचिन तेंडुलकर यांनी भेट केली. जागतिक फुटबॉलपटू लिओनाल मेस्सीनेही सचिन तेंडुलकर याला फुटबॉल भेट दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जागतिक फुटबॉलपटू लिओनोल मेस्सी यांनी जर्सी भेट दिली. पार्थ जिंदाल, वेदना जिंदाल यांनी जिंदाल ग्रुपतर्फे व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन मार्फत ७५ लाख रुपयांचा चेक प्रोजेक्ट महादेवाला दिला. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी तर्फे व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन मार्फत ९९ लाख ९९ हजार रुपयांचा धनादेश प्रोजेक्ट महादेवाला दिला.

सक्षम आणि शाश्वत फुटबॉल विकास व्यवस्था उभी राहणार

'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चखढठ), व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (तडढऋ), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखऋ), सिडको (उखऊज) आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे धोरणात्मक दिशा, तळागाळातील सहभाग, व्यावसायिक फुटबॉल कौशल्य, पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय पाठबळ मिळून राज्यात एक सक्षम आणि शाश्वत फुटबॉल विकास व्यवस्था उभी राहणार आहे.

प्रोजेक्ट महादेवा हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाचा उपक्रम

प्रोजेक्ट महादेवा हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे, जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेण्यासाठी आणि त्यांना विकसित करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले, ३० मुली) पाच वर्षांसाठी संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# प्रभाग क्र. २२ मध्ये टकारी समाजासाठी सांस्कृतिक हक्काचे स्वप्न साकार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष निधीतून ५० लाखांचे सांस्कृतिक भवन; नगरसेवक किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या भरीव प्रयत्नांना यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रभाग क्रमांक २२ येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत टकारी समाजासाठी उभारण्यात आलेल्या सांस्कृतिक भवनाचा भव्य उद्घाटन सोहळा उत्साही व ऐतिहासिक वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रभाग क्र. २२ चे लोकप्रिय नगरसेवक किसन जाधव आणि सहकारी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या अथक व विशेष प्रयत्नातून हा महत्त्वाकांक्षी विकासप्रकल्प साकार झाला आहे.

विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष विकास निधीतून ५० लाख रुपयांचा भरीव निधी या सांस्कृतिक भवनासाठी मंजूर करण्यात आला असून, त्यामुळे टाकारी समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना कायमस्वरूपी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. याप्रसंगी टाकारी समाजाच्या वतीने नगरसेवक किसन जाधव व नगरसेवक नागेश गायकवाड यांचा शाल व फेटा बांधून सन्मान करण्यात आला. समाजाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल समाजबांधवांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली यावेळी समाजाचे जेष्ठ टकारी समाजाचे अध्यक्ष गैबू (काका)जाधव, डॉक्टर सायबु गायकवाड, युवक अध्यक्ष विनोद जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करत किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांचे आभार मानले तसेच टकारी समाजातील राष्ट्रीय खेळाडू अंबादास गायकवाड यांची कबड्डी राष्ट्रीय प्रशिक्षक (कोच) पदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक किसन जाधव यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. टकारी समाज हा परिश्रम, एकजूट आणि स्वाभिमान जपणारा समाज म्हणून ओळखला जातो. समाजाची सांस्कृतिक ओळख जपली जावी, युवकांना दिशा मिळावी आणि पुढील पिढीला संस्कारांचे केंद्र उपलब्ध व्हावे, या भावनेतूनच किसन जाधव व नागेश गायकवाड यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा निधी मंजूर करून घेतला, अशी भावना उपस्थित समाजबांधवांनी व्यक्त केली. या उद्घाटन सोहळ्यास टाकारी समाजातील ज्येष्ठ व मार्गदर्शक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये गैबु (काका) जाधव डॉ. साहेबराव गायकवाड, बसु मामा गायकवाड, शिवाजी जाधव, सुनील जाधव, विद्यासागर (पिंटु) जाधव, तुकाराम मामा जाधव, भारत जाधव, सायबु गायकवाड सुहास सर राजु जाधव दिपक (सरपंच)जाधव यांच्यासह समाजाचे आधारस्तंभ सहभागी झाले होते. युवकांचे नेतृत्व करत टाकारी समाज युवक अध्यक्ष विनोद जाधव, तसेच सचिन अक्षय जाधव, सूर्यकांत मामा गायकवाड, राजाराम जाधव, सचिन जाधव, अंबादास गायकवाड, सुहास सर जाधव निखिल हैसनुर आदी युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी महिला भगिनींची उपस्थितीही उल्लेखनीय ठरली.

पारुबाई जाधव प्रयगाबाई गायकवाड, इंदुताई गायकवाड, पुनमताई गायकवाड, राजश्रीताई जाधव, नेहा(डॉली)जाधव महादेवीताई जाधव, कमळाताई जाधव, रेखाताई गायकवाड, शांताताई गायकवाड,



भिमताई गायकवाड यांच्यासह माता-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या. या प्रसंगी उपस्थित समाजबांधवांनी किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या समाजाभिमुख, विकासनिष्ठ नेतृत्वाचे विशेष कौतुक केले. समाजाच्या गरजा समजून घेणारे, निधी आणणारे आणि प्रत्यक्ष काम पूर्ण करणारे नेतृत्व म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. टकारी समाजासाठी हे सांस्कृतिक भवन म्हणजे केवळ इमारत नसून, एकतेचे, स्वाभिमानाचे आणि पुढील पिढीच्या उज्ज्वल भवितव्याचे केंद्र ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. एकूणच, हा उद्घाटन सोहळा राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक बांधिलकीचा, विकासाभिमुख राजकारणाचा आणि किसन जाधव, नागेश गायकवाड यांच्या समाजनिष्ठ नेतृत्वाचा ठसा उमटवणारा ठरला.

---

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या चित्रकला स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद



## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच छंद जोपासला पाहिजे : उपायुक्त लोकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : विद्यार्थ्यांनी कोणताही अभ्यास करताना समजून घेतला पाहिजे. गुरुजी व शिक्षक काय शिकवतात याच्यावर लक्ष दिले पाहिजे. चांगले अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर आणि समाजसेवक व्हावे. मोबाईल, टीव्हीमध्ये वेळ न घालवता अभ्यास करावा. त्याचबरोबर चित्रकला, अवांतर वाचन असा एखादा छंद जोपासला पाहिजे. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानाचे काम कौतुकास्पद आहे. अतिशय सुंदर उपक्रम राबविण्यात येतात, असे प्रतिपादन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सोलापूर महापालिका उद्यान विभागाचे अजयकुमार चव्हाण, समाजसेवक जवहार मुंदडा, मारवाडी युवा मंचाचे अध्यक्ष आनंद शर्मा, संस्थेचे अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ दृश्यकला विभागाचे धनजय टाकळीकर, दयानंद पटणे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. दोन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी मांडले तर आभार प्रदर्शन गणेश येळमेली यांनी मानले.

श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त दहा उपक्रम राबविण्यात येत असून हा सातवा सामाजिक उपक्रम घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थी दत्तक योजना, सॅनिटरी पॅड वितरण, स्टील पाणी टाकी स्थापन, अन्नदान, दिवाळी फराळ वाटप, हॉस्टेल मधल्या विद्यार्थ्यांना चादर वाटप याचा समावेश असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष महेश कासट यांनी प्रास्ताविकात दिली.

कार्यक्रमात यशस्वी होण्यासाठी संतोष अलकुंटे, दीपक बुलबुले, अभिजीत व्हनकळस, श्रीरंग रेगोटी, महेश भाईकट्टी, सुरेश लकडे, राजेश केकडे, श्रीनाथ श्रीगन, शिला तापडिया, सुजाता सक्करगी, अक्षता कासट, मनुश्री कासट, आर्या लचके, श्रेया लचके, शुभांगी लचके, रुपा कुत्ताते आदींनी परिश्रम घेतले.

या स्पर्धेचा निकाल असा

बक्षिस लहान गट (३ री ते ५ वी)-

प्रथम क्रमांक - पृनित बोराडे, द्वितीय - चेचक राका, तृतीय- स्वरा मनाळे, उत्तेजनार्थ- ऋतुजा हुळ्ळे व आयुष दंतकाळे.

मोठा गट (६ वी ते ८ वी) - प्रथम - सृष्टी हराळे, द्वितीय- आरवी राका, तृतीय - ध्रुवी राका, उत्तेजनार्थ- कार्तिकी स्वामी व शर्य हलकुडे आदी.

---

# खेळातून होतो व्यक्तिमत्वाचा विकास : बाळासाहेब क्षीरसागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिक्षणाबरोबरच आपण आपल्यातील कलागुण ओळखून त्याचा विकास केला पाहिजे. त्यासाठी मेहनत घेण्याची तयारी असली पाहिजे. जीवनात अनंत अडचणी येतात. त्या अडचणींवर मात करून जो पुढे जातो तोच जीवनात यशस्वी होती. आजच्या डिजिटल युगात आपण मोबाईलच्या नादाला लागून आपले नुकसान करतो आहोत. म्हणून प्रत्यक्ष मैदानी खेळ हे तुमच्या शरीराला आणि मनाला बळकटी देतात. खेळातून आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास घडून येतो. असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाजाचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले.





के. के. वाघ शिक्षण संस्था, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन व स्माईल स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलंस यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन, के. के. वाघ कॅम्पस काकासाहेबनगर येथील भव्य मैदानावर त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ होते. त्यांनी विद्यार्थी खेळाडूना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खरे गुण दडलेले असतात मात्र त्यांना आपल्यातील कौशल्य दाखविण्यासाठी त्यांना व्यासपीठ मिळत नाही. त्यांच्यातल्या कलागुणांना स्थान मिळावे, याच उद्देशाने कर्मवीर काकासाहेब वाघ क्रीडा चषकाची निर्मिती केली.

### वाघ स्मृती चषक कबड्डी स्पर्धेचे जल्लोषात उद्घाटन

स्पर्धा संयोजक एस. पी. क्षीरसागर यांनी क्रीडा चषकाच्या स्पर्धेचा गेल्या तेरा वर्षांचा आढावा आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शरद कदम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अरुण ठोके यांनी केले. आभार वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी रामनाथ पानगव्हाणे, विलास वाघ, बाळासाहेब वाघ, तेजेंद्र वाघ, रामभाऊ पाटील, रघुनाथ कोल्हे, कचुनाना शिंदे, संदीप वाढवणे, पी. आर. जाधव, भाऊसाहेब शिंदे, अशोक आहेर, संदीप साबळे, राहुल वाघ, सोपान वाघ, वैभव कुशार, प्रवीण वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

के. के. वाघ महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय आणि इंग्लिश मिडीयच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.

---

# विबोधी महिला फाउंडेशनचा शिक्षणासाठी मायेचा हात
# दुधनीतील शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : समाजातील गोरगरीब व वंचित घटकांतील मुलांच्या शिक्षणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या विबोधी महिला फाउंडेशनचे कार्य खरोखरच कौतुकास्पद असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. विबोधी महिला फाउंडेशन व सौ. शितल परब मॅडम यांच्या संयुक्त विद्यमाने आज जि. प. प्राथमिक मराठी शाळा, शिवाजीनगर तांडा, दुधनी येथे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास विबोधी महिला फाउंडेशनच्या सर्वेसर्वा सौ. वर्षा यादव मॅडम प्रमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या वतीने बालकलाकार विबोधी यादव व सौ. वर्षा यादव मॅडम यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना श्री. पोमू राठोड यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून विबोधी महिला फाउंडेशनच्या माध्यमातून या शाळेस विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य तसेच गणवेशांचे वाटप केले जात आहे. गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, शाळेची गोडी लागावी आणि शिक्षण घेत असताना कोणत्याही आवश्यक गोष्टींची कमतरता भासू नये, या भावनेतून फाउंडेशन सातत्याने कार्यरत आहे. हे कार्य विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत प्रेरणादायी असून पुढील काळातही विविध स्वरूपात शाळेला मदत करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.

या कार्यक्रमास सौ. वर्षा यादव, बालकलाकार विबोधी यादव, श्री. पोमू राठोड, श्री. श्रशैल मलगण, श्री. सुरूपसिंग राऊत व सौ. पार्वती ढाकरे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. पोमू राठोड यांनी उपस्थित मान्यवरांचे व फाउंडेशनचे आभार मानले.

विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत उमटलेला आनंद आणि शिक्षणाविषयी निर्माण झालेली उमेद, हेच विबोधी महिला फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे खरे यश असल्याची भावना यावेळी सर्वत्र व्यक्त होत होती.

---

### ८ कोटी ३६ लाख ८६ हजार रुपयांची तडजोड शुल्क वसूल

### मोटार अपघात दावा एक कोटी रुपयांचा तडजोडीने मिटवला

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये २१४ प्रकरणे निकाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तालुका विधी सेवा समितीच्यावतीने जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये २१४ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये एकूण ८ कोटी ३६ लाख ८६ हजार ६४९ रुपयांची तडजोड झाली. तसेच यामध्ये मोटार अपघात दावा एक कोटी रुपयांच्या तडजोडीने मिटवला असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे प्रभारी अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.एस. सलगर यांनी दिली.



या लोकअदालतीसाठी एकुण ५ पॅनलची व १ नियमित न्यायालयाचे व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये जिल्हा न्यायाधीश ए.एस. सलगर, न्यायाधीश श्री. एन. एस. बुद्रुक, न्यायाधीश श्रीमती एस. एस. राऊळ, न्यायाधीश श्रीमती के. जे. खोमणे न्यायाधीश श्रीमती पी. आर. पाटील, न्यायाधीश श्री. ए. एस. सोनवलकर, यांनी काम पाहिले.

सदरची लोकअदालत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.एस.शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ए.एस. सलगर ,न्यायाधीश श्रीमती एस. एस पाखले व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग श्रीमती के. जे. खोमणे यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन लोकअदात संपन्न केली. न्यायाधीश यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन संपन्न केली. या लोकअदातीमध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, पंढरपूर येथील एक कोटी रूपयांचा मोटार अपघात दावा जिल्हा न्यायाधीश ए. एस. सलगर, ॲड. व्ही. एम. भोसले, पॅनल विधीज्ञ तथा अध्यक्ष पंढरपूर अधिवक्ता संघ यांनी तडजोडीने बोलणी करून प्रकरण लोकअदातीमध्ये मिटवले.

या लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, महावितरणचे अधिकारी, गटविकास अधिकारी, पक्षकार, न्यायालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते व त्यांचे सर्वांचे सहकार्याने सदरचे लोकअदालत यशस्वीरित्या पार पाडण्यात आले.

---

# नांदूर्डी शिवारात अनोळखी व्यक्तीचा मृत्यू देह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदुर्डी शिवारात शेत तळ्यामध्ये एक पुरुष जातीचे वय ३० ते ३५ अंदाजे अनोळखी प्रेत सापडले असून त्याच्या अंगावर पांढऱ्या रंगाचा शर्ट कमरेस नाईट पॅन्ट केशरी रंगाचे स्वेटर काळी चप्पल असे असून त्याचे उजव्या हातावर इंग्रजीमध्ये सिद्धांत (डखऊ्रक्षछढ)असे नाव गोंदलेले असून सदर इसम कोणाच्या ओळखीचा असेल तर त्यांनी तात्काळ निफाड पोलीस ठाणे तसेच नांदुर्डी गावचे पोलीस पाटील प्रभाकर निकम यांच्याशी संपर्क साधावा.

निफाड पोलीस स्टेशन

पोलीस कॉन्स्टेबल ढवळे ८७८८७६९७१९,

प्रभाकर निकम पोलीस पाटील नांदुर्डी ९०२१३३३१३१

# पंढरपूरमध्ये काणे सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये कॅन्सरची शस्त्रक्रिया यशस्वी

## सलग आठ तास चालली शस्त्रक्रिया; डॉ. वर्षा काणे यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील डॉक्टर काणे गायत्री सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल मध्ये ८० वर्षाच्या पुरुष रुग्णावर अतिशय गुंतागुंतीची कॅन्सर शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार होऊन आज ठणठणीत बरा झाला आहे. अत्यंत जोखमीची ही शस्त्रक्रिया सलग आठ तास सुरू होती. डॉक्टर वर्षा काणे व त्यांच्या टीमने यांनी सदरची शस्त्रक्रिया पार पाडली.




याविषयी अधिक माहिती सांगताना सर्जन डॉक्टर वर्षा काणे यांनी सांगितले वीस दिवसापूर्वी पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागात राहत असलेला एक कॅन्सर पिढीत रुग्ण दाखल करण्यात आला व त्या रुग्णावर मूत्राशयाचा कॅन्सर झालेला होता त्या टुमार एवढा मोठा होता अत्यंत जोखमीचे ऑपरेशन आठ तास सुरू होते तीन ठिकाणी भूल देऊन ऑपरेशन करण्यात आले लघवीच्या पिशवीतच कॅन्सरची गाठ असल्याने किडनी कडून आलेला नळ्या वळवणीत आल्या व आतड्यांचा तुकडा काढून नवीन मूत्राशी मूत्र मार्ग तयार करण्यात आला, आणि मग कॅन्सरग्रस्त भाग काढून टाकण्यात आला अत्यंत जोखमीची ही शस्त्रक्रिया होती त्यानंतर हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया नंतर रुग्ण व्यवस्थित सर्व तपासणी त्यांना होणारा त्रास यातून सुटका केली असून रुग्ण ठणठणीत बरा होऊन आनंदाने घरी गेला आहे.

त्याचबरोबर डॉक्टर काणेज गायत्री सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये रविवारी दिनांक १४ डिसेंबर रोजी युरोलॉजिस्ट आठ ऑपरेशन शासकीय योजनेतून करण्यात आली प्रोटेस्टंट ग्रंथाची चार आणि मुतखड्याची चार अशी आठ ऑपरेशन करण्यात आली विशेष म्हणजे हे सर्व पेशंट सत्तर वर्षाच्या पुढचे होती व यातील दोन पेशंटचा शुगर बीपी त्रास होता तर एका पेशंटची एन्जॉय प्लास्टिक एकाची बायपास सर्जरी झाली होती एका पेशंटच्या किडनी ४२ मिमी एवढा मोठा खडा निघाला तर तिसऱ्या पेशंटच्या मूत्राशयात एकूण ९२ खडे निघाले ही सर्व ऑपरेशन पंतप्रधान आरोग्य योजना तसेच महात्मा फुले या जन आरोग्य योजनेतून करण्यात आले आहे.

सुप्रसिद्ध भूलतज्ञ डॉक्टर दीपा गुंडेवार यांनी भूल दिली होती व ऑपरेशन यशस्वी करण्यासाठी डॉक्टर सुरेंद्र काणे डॉक्टर वर्षा काने डॉक्टर फाईन गोली वाले व्यवस्थापक विश्वास पाटील गाणे सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटल येथील सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले आहे.

# अखेर 'त्या' रस्त्यावर गतिरोधक बसविले

घाटकोपर/केतन भोज : अमृत नगर ओएनजीसी कॉलनी,बँक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर वाहनांचा वेग कमी करण्यासाठी वारंवार स्थानिक स्कूल बस वाहन चालक तसेच नागरिकांकडून



याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी होत होती. मुख्य म्हणजे याठिकाणी शाळा, बँक, मार्केट जवळ असून, तसेच आणि हा प्रचंड रहदारीचा रस्ता असल्यामुळे याठिकाणी भविष्यातील अपघात टाळण्यासाठी येथे गतिरोधक बसविणे गरजेचे होते.याशिवाय सकाळच्या वेळी स्कूल बस देखील मोठ्या प्रमाणावर या रस्त्यावरून येत- जात असतात.त्यामुळे शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करता भविष्यात याठिकाणी कोणताही अपघात होऊ नये यासाठी याची गांभीर्यता ओळखून तातडीने प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके आणि पत्रकार केतन भोज यांच्या पुढाकाराने व सततच्या केलेल्या पाठपुराव्यामुळे मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे,रस्ते अभियंता संतोष झिंजोर्डे यांच्या माध्यमातून याठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले.यावेळी कंत्राटदार प्रदिप भोसले यांनी हे गतिरोधक बसविण्याचे काम व्यवस्थिपणे करून दिले. अमृत नगर ओएनजीसी कॉलनी,बँक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आल्यामुळे यावेळी स्कूल बस वाहन चालकांनी समाधान व्यक्त केले.

# कळंब येथील लोकअदालतीमध्ये ५२२ प्रकरणे निकाली, तर ३८ लाख ५८ हजार २६२ रुपयांची तडजोड

## पाच पॅनलमार्फत झाले कामकाज; तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ कळंब श्री. आर. के. राजेभोसले यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण यांचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उस्मानाबाद यांचे मार्गदर्शनाखाली दि. १३ डिसेंबर, २०२५ रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कळंब या ठिकाणी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील लोकअदालतीमध्ये एकुण पाच पॅनल तयार करण्यात आलेले होते. पॅनल क्रमांक एक साठी श्री. आर. के. राजेभोसले जिल्हा न्यायाधीश-१ कळंब यांनी पॅनल प्रमुख तर ड. ए.एन.गवळी यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले तर पॅनल क्रमांक २ साठी श्री. पी. आर. कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश व. स्तर कळंब यांनी पॅनल प्रमुख तर ड. श्रीमती ए. पी.कोठावळे यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले. पॅनल क्रमांक ३ साठी श्री. के. के. चौधरी, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळंब यांनी पॅनल प्रमुख तर ड .श्रीमती यु.बी. चौधरी यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले. पॅनल क्रमांक ४ साठी श्री. एन. एम. रेड्डी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळंब यांनी पॅनल प्रमुख तर ड. श्रीमती ए. डी. कांबळे यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले. तर पॅनल क्रमांक ५ साठी श्रीमती ए. डी. जाधव मॅडम, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळंब यांनी पॅनल प्रमुख तर ड. श्रीमती पी. एस. कणसे यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले.



सदरील लोकअदालतीमध्ये पाच पॅनलकडील ठेवण्यात आलेल्या एकुण १२६ दिवाणी प्रकरणांपैकी २१ दिवाणी प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली. सदरील प्रकरणामध्ये मोटार अपघात विमा क्लेमच्या २ प्रकरणामध्ये रक्कम रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) तर रक्कम वसुलीबाबतच्या दरखास्तीच्या एकुण १ प्रकरणामध्ये २,०३,३५९/- (अक्षरी रुपये दोन लाख तीन हजार तीनशे एकोणसाठ) आणि इतर १८ दिवाणी प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली. तसेच विविध स्वरुपाच्या एकुण ७५ फौजदारी प्रकरणांपैकी कौटंबिक हिंसाचार प्रकरणातील अपिलाच्या १ प्रकरणे मिटविण्यात आली, ज्यामध्ये रक्कम रुपये २,२०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख वीस हजार) इतक्या रकमेची तडजोड झाली व इतर १ फौजदारी प्रकरण मिटविण्यात आले. तर गुन्हा कबुलीच्या एकुण ७० प्रकरणांपैकी २२ प्रकरणामध्ये रक्कम रुपये १२,२००/- (अक्षरी रुपये बारा हजार दोनशे) इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आली. त्याचप्रमाणे सदरील लोकअदालतीच्या दिवशी विविध बँका, ग्रामपंचायती, नगर परिषद, पतसंस्था अशा इतर कार्यालयांमार्फत एकुण १७७७ दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणे सादर करण्यात आलेली होती, त्यापैकी बँकेच्या एकुण १२ दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणांमध्ये बँक यांचेमार्फत लोकअदालती दिवशी एकुण रक्कम रुपये १३,७९,१००/- (अक्षरी रुपये तेरा लाख एकोणऐंशी हजार एकशे) इतकी रक्कम वसुल करण्यात आली. त्याचप्रमाणे लोकअदालतीच्या अनुषंगाने नगर परिषद कळंब यांचे वतीने एकुण ३२ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ६,६१,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख एकसष्ठ हजार तीस) इतकी रक्कम नगर परिषद स्तरावर वसुल करण्यात आली. कळंब तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या एकुण ४३३ दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणांमध्ये संबंधित ग्राम पंचायतीमार्फत ग्रामपंचायत स्तरावर एकुण रक्कम रुपये ३,८२,६०३/- (अक्षरी रुपये तीन लाख ब्याऐंशी हजार सहाशे तीन) इतकी रक्कम लोकअदालतीच्या माध्यमातून वसुल करण्यात आल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ कळंब श्री. आर. के. राजेभोसले यांनी दिली. राष्ट्रीय लोकअदालत सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विधीज्ञ मंडळातील सर्व विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी तसेच पोलिस प्रशासन यांनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे ३० डिसेंबर रोजी साखरखेर्डा येथे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : साखरखेर्डा ,ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा येथील सांस्कृतिक क्षितिजावर लवकरच एक तेजस्वी पर्वणी अवतरणार आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पावन जयंतीनिमित्त, तसेच समाजभूषण, पर्यावरणप्रेमी, वृक्षमित्र दिवंगत मधुकरराव खंडारे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून व समाजभूषण मा. अर्जुनराव गवई यांच्या जन्मदिनी, एका राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे मा. सचिन खंडारे पत्रकार संपादक यांनी भव्य आयोजन केले आहे.

शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता, वैद्यकीय, रंगभूमी, कला, नाट्य आणि राज्यभरातील इतर विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाने मोलाची भर घालणाऱ्या गुणवंत व्यक्तींकडून या पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद लाभला. विहित दिनांकापर्यंत निवड समितीकडे अगदी शेकडो प्रस्ताव प्राप्त झाले होते, ज्यात प्रत्येक परिचय प्रस्ताव हा कार्याची व कर्तृत्वाची साक्ष देणारा होता.

परंतु, निवड समितीचे अध्यक्ष साहित्यिक, लेखक, समीक्षक विकास सुखधाने आणि मुख्य आयोजक मा. सचिन खंडारे पत्रकार यांच्या वतीने गुणांकन व निर्धारित निकषांच्या आधारे, या सर्वार्थाने भाग्यवंत सारस्वतांची व गुणीजनांची राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी अंतिम निवड करण्यात आली आहे.

या सर्व भाग्यवंत सारस्वतांना आणि गुणिजनांना सन्मानाने गौरवण्यासाठी हा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा दिनांक येत्या ३० डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी सकाळी १० वाजता अनिकेत सैनिक स्कूल शेंदुरजन रोड साखरखेर्डा येथे संपन्न होणार आहे.

**विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा पुरस्काराने होणार गौरव!**

**प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार गौरव**

या दिमाखदार सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा. मनोज भाऊ कायंदे (आमदार, सिंदखेडराजा विधानसभा), डॉ. राजेंद्र शिंगणे साहेब (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. सिद्धार्थ खरात साहेब (आमदार, मेहकर विधानसभा), मा. रविकांतजी तुपकर साहेब (माजी राज्यमंत्री दर्जा व संस्थापक अध्यक्ष, शेतकरी संघटना), मा. योगेश जाधव (युवा नेते, शिवसेना, मेहकर) आणि मा. शशिकांत खेडेकर साहेब (माजी आमदार, सिंदखेडराजा) यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या शुभहस्ते या सर्व भाग्यवंत सारस्वतांचा यथोचित सत्कार व सम्मान करून त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान मा. सचिन अंबादास काटे (संस्थापक अध्यक्ष, अस्तित्व फाउंडेशन) हे भूषवतील.

वक्त्यांचे वैचारिक मार्गदर्शन

याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून मा. संजय खडसे (उपजिल्हाधिकारी, सिंदखेडराजा), मा. विलास बड़े (संपादक, लोकमत आयबीएन), मा. भाई कैलास सुखधाने (भीमशक्ती राज्य नेते) आणि मा. गजेंद्र गवई (लॉर्ड बुद्धा टीव्ही चॅनल, बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी) हे आपले वैचारिक मार्गदर्शन करतील.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष मा. रमेश ठोसरे (मुख्याध्यापक, जिजामाता विद्यालय, साखरखेर्डा) आणि संतोष दसरे (प्राचार्य, एस. एस. जुनियर कॉलेज, साखरखेर्डा) हे असतील. कार्यक्रमाचे ओजस्वी सूत्रसंचालन वैशाली तायडे आणि स्नेहल सरकटे (बुलढाणा) यांच्या वाणीतून होणार आहे.

या ज्ञानयज्ञ सोहळ्यास, सर्व गुणीजनांनी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे विनम्र आवाहन निमंत्रक तथा मुख्य आयोजक मा. सचिन मधुकरराव खंडारे पत्रकार आणि माजी केंद्रप्रमुख, पत्रकार दिलीपराव खंडारे यांनी केले आहे.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन ची १४७ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

# विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपिटक समजून घेण्याची आवश्यकता आहे : भदंत सुदत्त बोधी थेरो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर, (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने जो धर्म माणसाला माणुसकीने वागवीत नाही, त्याला धर्म कसे म्हणावे? या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर १४७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे १४ डिसेंबर २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, कुठल्याही व्यक्तीने एखाद्या विचाराला धारण करणे म्हणजे तो त्याच्यासाठी धर्म होय. धर्मांतर घोषणेच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ डिसेंबर १९३५ ला जो धर्म माणसाला माणुसकीने वागवीत नाही त्याला धर्म कसे म्हणावे? असा गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. ते आजही तेवढेच प्रासंगिक वाटते. मानवी समाजाला माणुसकीयुक्त बनविणे म्हणजे बुद्धमय बनविण्यासारखेच आहे. करिता सारा भारत बौद्धमय करण्यासाठी या देशातील सर्व नागरिकांना मानवतावादी बनविणे आवश्यक आहे. अर्थात मानवी दृष्टिकोनातून प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांच्या वर्तनात मानवतावाद अंतर्भूत असेल तर प्रत्येक व्यक्ती दुसऱ्याशी व्यवहार करताना मानवता वादाप्रमाणे उचित व्यवहार करेल. करिता जी विचारधारा माणसाला शील व सौजन्ययुक्त माणुसकीने वागविण्याचा संदेश देईल त्याच विचारधारेला आपण धर्म असे म्हटले पाहिजे. अशा अनेक बाबी समजून घेऊन समजावून सांगण्यासाठी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनने सदरील ऐतिहासिक विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकरराईट स्टडी फाउंडेशनचे समन्वयक इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, ज्या महिला बालकावर संस्कार करतात त्या महिलांमध्ये परिवर्तनवादी विचारांचे बिजारोपण होण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून अंध रूढी परंपरा नष्ट केल्या जाऊ शकतील. चळवळ चालविण्यासाठी डॉ. आंबेडकराप्रमाणे त्याग केला पाहिजे. ज्या महिलांसाठी आंबेडकरांनी त्याग केला त्याच महिला वैचारिक दृष्ट्या कृतघ्न आहेत. महिलांची विचारशक्ती जागृत नसल्यामुळे त्या अनिष्ट रूढी परंपरा पाळत असतात. आपण सर्वांनी जय जिजाऊ! जय भीम!! जय शिवराय!!! या अभिवादनाचा वापर केला पाहिजे. साडी, गाडी आणि माडी या मोहपाशातून लाभार्थी समाजाला बाहेर काढले पाहिजे, तरच माणुसकीय युक्त समाज निर्माण होऊ शकेल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना भदंत सुदत्त बोधी थेरो म्हणाले की, कुत्र्या मांजराला आश्रय देणाऱ्या धर्माने माणसा माणसात भेद करून अस्पृश्यांना माणूस पण नाकारले अशा धर्माचे अस्तित्व देशात असल्यामुळे त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मी हिंदू धर्मात जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी भीम गर्जना केली होती. एवढेच नव्हे तर हिंदू धर्म हा महारोग आहे, असेही स्पष्ट केले होते. प्रदर्शनात लोक प्रचंड गर्दी करतात, मात्र त्यांची पावले कार्यशाळेकडे वळत नाहीत कारण इथे फक्त दर्दी लोक येतात. इतर संघटना विनयपिटकाप्रमाणे शिस्त पाळत असल्यामुळे आता आपण सर्वांनी विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्मपिटक समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

याप्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, धर्म हा विषमतावादी तर धम्म हा समतावादी आहे. दीक्षित होणे महत्त्वपूर्ण असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर प्रसंगी दरेकाने दरेकाला धम्मदीक्षा देण्याचा अधिकार प्रदान केला आहे. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागणे हाच मानवी धर्म होय. आनंद शेळके म्हणाले की, नवीन पिढीवर धम्म-बिंबविला पाहिजे वाय. एस. खोब्रागडे म्हणाले की, विविध जाती जमातीतील बालकांवर लहानपणापासूनच विद्यार्थी असताना संस्कार केले पाहिजेत. उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, धम्म हा पाली तर धर्म हा संस्कृत शब्द आहे. त्यामुळे भाषेचा बाऊ करू नये. डी. जे. वर होणारा खर्च धम्माच्या प्रचार प्रसारासाठी खर्च केला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, ज्याच्या घरी नाही पीठ, ते मागतात विद्यापीठ अशी अवधारणा असणाऱ्या पासून आपण सावध राहिले पाहिजे.

याप्रसंगी उत्तम जयराम जाधव, साधू आनंद यांची विशेष उपस्थिती लाभली होती. सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक विलास रामटेक तर आभार उद्योजक शशिकांत काळे यांनी व्यक्त केले.